मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे - एकनाथ शिंदे >>पान 2

संजय राऊतनी कुणाकुणाकडून पैसे घेतले ती यादी आमच्याकडे, गरज पडल्यास बाहेर काढू : संजय शिरसाट यांचा गौप्यस्फोट >>पान 3

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४१ वा दीक्षांत समारंभ >>पान 4


**सुविचार**

सामाजिक समस्यांवर चर्चा करणे ही समाजाची साक्षरता वाढवते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 194 ■ सोमवार, दि. 24 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006






१००० दिवस थिएटरमध्ये हाऊसफुल! या अभिनेत्रीच्या सिनेमाने गाजवलं बॉक्स ऑफिस

आतील पान

# 'गण गण गणात बोते'चा गजर सातासमुद्रापार

## ढोल ताशांच्या गजरात इंग्लंडमध्ये गजानन महाराज प्रगट दिन सोहळा साजरा

**अमरावती/प्रतिनिधी** : 'गण गणात बोते' अर्थात प्रत्येकामध्ये परमेश्वर बघा अशा या मंत्राला संत गजानन महाराजांच्या भक्तीला कुठल्याही सीमा नाहीत. यामुळं थेट सातासमुद्रापार इंग्लंडमध्ये शनिवारी (२२ फेब्रुवारी) संत गजानन महाराजांचा १४७ वा प्रकट दिन सोहळा साजरा करण्यात आला. लंडन शहरापासून ६० किमी अंतरावर असणाऱ्या इंग्लंडमधील ब्रॅकनेल परिसरात हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गजानन महाराज यू. के. परिवाराच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात सहभागी भाविक संत गजानन महाराजांच्या भक्तीत तल्लीन झाल्याचं बघायला मिळालं.




अभिषेक, नामजप आणि पालखी : शनिवारी सकाळीच संत गजानन महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. यानंतर भाविकांनी 'गण गण गणात बोते' या मंत्रासह संत गजानन महाराजांचा नामजप केला. सामूहिक पारायणात अनेक भाविक सहभागी झाले. दुपारी १२ वाजता आरती झाल्यावर १ वाजता महाप्रसाद वितरीत करण्यात आला. विशेष म्हणजे शेगावला ज्याप्रमाणे महाप्रसादालय आहे, अगदी तशीच व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली.

पालखी सोहळा ठरला आकर्षण : सायंकाळी सहा वाजता संत गजानन महाराजाची पालखी काढण्यात आली. मराठमोळ्या वेशातील महिला आणि पुरुषांनी एकत्रित येऊन संत गजानन महाराजांची पालखी काढली. यावेळी महाराजांच्या पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. मिरवणुकीतील लेझीम पथकानं सर्वांचं लक्ष वेधलं.

दहा वर्षांची परंपरा : ''संत गजानन महाराज यांच्या प्रकट दिन सोहळ्याची परंपरा गेल्या दहा वर्षांपासून इंग्लंडमध्ये सुरू आहे. गजानन महाराज यू.के. परिवाराच्या वतीनं हा सोहळा आयोजित केला जातो,'' अशी माहिती आयोजक परेश देशमुख यांनी दिली. तसंच गजानन महाराज परिवारात सहाशे सदस्य सहभागी असून आमचा हा परिवार दिवसेंदिवस वाढत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

शिवचरित्रावरही टाकला प्रकाश : ''संत गजानन महाराज प्रकतदिनानिमित्त आयोजित सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर देखील प्रकाश टाकण्यात आला. इंग्लंडमधील आमच्या लहान मुलांना छत्रपती शिवाजी महाराज कळावेत, यासह महाराष्ट्राची संस्कृती समजावी. यावर देखील भर देण्यात आला'', असे भाविक मयूर यांनी सांगितले.

# चंद्रपुरातील लाल मिरचीचा ठसका थेट युरोपात; जिल्ह्यातील पहिल्याच प्रयोगाला यश

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : पारंपरिक शेतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यात कापूस, सोयाबीन आणि धानाची शेती केली जाते. तर काही प्रमाणात मिरचीची देखील लागवड केली जाते. मात्र, अधिक उत्पादन खर्च आणि मिळणारा कमी भाव यामुळं शेतकरी मिरची लागवड करण्यास फारसा उत्सुक नसतो. दुसऱ्या बाजूला भारतीय मिरचीची जगात सर्वाधिक मागणी आहे. भारतीय मसाल्यांपैकी मिरची ही सर्वाधिक निर्यात केली जाते. मात्र, विदेशी मानकात खरी उतरलेल्या मिरचीला तिथे पाठवता येऊ शकते. याबाबत चंद्रपूर जिल्ह्यातील मिरची उत्पादक अनाभिन्न होते. यासाठी 'कृषक स्वराज' शेतकरी उत्पादक कंपनीनं पुढाकार घेतला आणि या कंपनीच्या प्रयत्नानं जिल्ह्यात पहिल्यांदाच येथील मिरची युरोपियन युनियन देशांच्या निकषात खरी उतरली आहे. त्यामुळं यंदा चंद्रपूरची मिरची ही सातासमुद्रापार जाणार आहे.



अशी सुचली कल्पना : शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन दिल्यास चंद्रपूर जिल्हा देखील यासाठी नंदनवन होऊ शकतो हे ओळखून सतीश गिरसावडे या युवकानं पुढाकार घेतला. त्यानं 'कृषक स्वराज' ही कंपनी सुरू केली. या माध्यमातून त्यानं प्रयोगशील शेतकऱ्यांना जोडले आणि सामूहिक प्रयोग सुरू केला. सतीश हा राजुरा तालुक्यातील असून या ठिकाणी मिरचीचे उत्पादन चांगल्या प्रमाणात घेतले जाते. याच पिकावर लक्ष केंद्रित करून त्याने हा प्रयोग सुरू केला. युरोपियन युनियनच्या मानांकनानुसार मिरचीची कशी लागवड कशी केली जाणं आवश्यक आहे याची संपूर्ण तांत्रिक माहिती त्यानं घेतली. याच माहितीचे धडे त्यानं अनेक शेतकऱ्यांनी दिले. त्यानुसार ऑगस्ट महिन्यात मिरचीची लागवड करण्यात आली, तर जानेवारी महिन्यात मिरचीचे पीक आले. यानंतर ह्या मिरचीचे नमुने बंगलुरु येथील खासगी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. जवळपास २० शेतकऱ्यांच्या मिरचीचे नमुने पाठविण्यात आले होते. त्यापैकी चार शेतकऱ्यांचे नमुने हे युरोपियन युनियन मानांकनाच्या निकषात खरे उतरले.








# जलजीवन मिशनचे अर्धवट काम बनले अवैध धंद्याचा अड्डा

## पाणी शुद्धीकरण खोलीत दारूच्या रिकाम्या बॉटल

## भविष्यात अनुचित प्रकार घडण्याची भीती

## जलजीवन मिशन : देशी दारूच्या बाटल्यांचा घमघमाट

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा : जलजीवन मिशन योजने अंतर्गत लोणी गवळी येथे ४ कोटी ५६ लाख रुपयांचा निधी खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविण्यात प्रारंभ करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत अडीच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. सदर काम हे अर्धवट असून पाणी शुद्धीकरण करण्यासाठी बांधलेल्या खोलीचा वापर आता मात्र, पाणी शुद्धीकरण करण्यासाठी न होता त्या ठिकाणी अवैध प्रकार सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. अर्धवट कामाच्या खोलीमध्ये देशी दारूच्या रिकाम्या बॉटल, बिसलेरी, बॉटल व चखण्याचे साहित्य दिसून आल्याने कोट्यवधी रुपयांचा खर्च हा अवैध धंदे करण्यासाठी केला की काय असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडत आहे.अर्धवट कामामध्ये अवैध धंदे सुरू असल्याने भविष्यात अनुचित प्रकार घडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष देत या प्रकाराला आळा घालण्यासाठी पावले उचलावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**

लोणी गवळी येथे ४ कोटी ५६ लाख रुपयांचा निधीचा खर्च करून जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे कामाला वर्षभरापूर्वी प्रारंभ करण्यात आला होता.मात्र, सदर काम अद्यापही पूर्ण झाले नाही. बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या ठेकेदाराकडून उदभव विहीर, मुख्य जल पंपगृह, पंपिंग मशिनरी वाहीनी, वितरण व्यवस्था पाण्याची उंच टाकी आदी कामे करण्यात आली आहेत. सदर कामे अर्धवट असल्याने नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहेत त्याचबरोबर अर्धवट बांधकामाचा वापर हा अवैध धंदे करण्यासाठी होत असल्याचा प्रकार समोर आला आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

पाणी शुद्धीकरण करण्यासाठी बांधण्यात आलेल्या खोलीत खोलीचा वापरा मद्यपी दारू पिण्यासाठी त्याच बरोबर या ठिकाणी पार्ट्या करण्यासाठी करीत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या खोलीमध्ये दैनिक आपला विदर्भच्या प्रतिनिधी पाहणी करण्यासाठी भेट दिली असता त्या ठिकाणी काम अपूर्ण दिसून आले. तर, अपूर्ण कामाच्या खोलीत अवैध प्रकार सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. सदर खोलीमध्ये देशी दारूच्या बाटल्या बिसलेरीच्या बाटल्या त्याचबरोबर चकना म्हणून वापरण्यात येणारे खाद्यपदार्थ पडलेले दिसून आले. यावरून या अर्धवट कामाचा वापर हा अवैध धंदे व पार्ट्या करण्यासाठी केला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. वरिष्ठ अधिकारी व ठेकेदाराच्या या मनमानी कारभाराने मात्र नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. तर, या अर्धवट कामाचा वापर मात्र, मद्यपी आपल्या जिभेचे चोचले पूर्ण करण्यासाठी करीत असल्याचे दिसून येत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन येथील प्रकाराला आळा घालावा आणि भविष्यात अनुचित प्रकार घडू नये, यासाठी उपाययोजना कराव्या, अशी मागणी होत आहे.

### अनुचित प्रकार घडण्याची शक्यता

जल जीवन मिशनच्या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या पाणी शद्धीकरण रूमचे कामे वर्षभरापासून अर्धवट असल्याने या अर्धवट बांधकाम झालेल्या खोलीमध्ये मद्यपी पार्ट्या करत असल्याचे समोर आले आहे. या ठिकाणी आढळून आलेल्या साहित्यावरून ही खोली अवैध धंद्याचा अड्डा बनल्याचे दिसून येत असून भविष्यात या ठिकाणी अनुचित प्रकार घडण्याचे शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेत या प्रकाराला आळा घालून उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## व्हॉट्सअप वाढदिवस!

आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग प्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग प्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग प्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग प्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग प्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते प्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ऍप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप !आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो. व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे – एकनाथ शिंदे

## राजधानीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा भावपूर्ण समारोप

### दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येणार – अजित पवार

### संस्कृतीची वाहक असलेल्या भाषेची निगा राखणे सर्वांचे कर्तव्य – डॉ. भवाळकर







नवी दिल्ली, : भाषा ही आपली ओळख, अस्मिता, आणि अभिमान असून भाषा हेच आपले अस्तित्व आहे. भाषा संपली तर आपले अस्तित्वही संपेल हे लक्षात घेऊन तिच्या संवर्धनासाठी सर्वांनी कटीबद्ध व्हावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी केले. मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही देताना नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली.

राजधानीतील तालकटोरा स्टेडिअममध्ये उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत गेले तीन दिवस सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप आज सायंकाळी झाला. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, लोकमत वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष विजय दर्डा, डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी डी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासह अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, निमंत्रक संजय नहार, शैलेश पगारिया, युवराज शहा यांच्यासह साहित्य महामंडळाचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

**जे जे मराठी, ते ते जोपासण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी – श्री.शिंदे**

मराठीला वैश्विक पातळीवर नेण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून यासाठी साहित्यिक, विचारवंत आणि शासनाकडून संयुक्तपणे प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा व्यक्त करून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्याच्या कारभारात मराठीचा वाढता वापर होत आहे. सर्वसामान्यांच्या व्यवहार व शिक्षणात मराठीचा वापर वाढण्याची गरज आहे. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज यांच्या नावे मराठी अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी राज्य शासनाने दहा कोटी रुपये दिले असून लवकरच हे केंद्र कार्यान्वित होणार आहे. राज्य सरकारने राज्यातल्या ग्रंथालयांना अनुदान वाढवून दिले आहे. नवलेखकांकडून कथा, कादंबरी, कवित या सर्वच क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. यामधून वर्तमानाचा वेध घेवून आजच्या पिढीचे प्रश्न मांडण्याचे धाडस केले जात आहे. या लेखकांच्या साहित्याची दखल घेण्याची जबाबदारी मराठी भाषिकांची आहे. मराठी साहित्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ग्रंथ प्रदर्शनांचे आयोजन केले जावे, अशी सूचना करतानाच रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठासाठी पुरेसे मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही श्री. शिंदे म्हणाले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठीतील विविध साहित्यप्रवाहांचा संगम आहे. महाराष्ट्राच्या भूमीत संतांनी भक्ती संप्रदाय निर्माण केला, तर, वीरांनी शक्ती संप्रदाय निर्माण केला. विविध लोककलांनी मराठी भाषा समृद्ध होत गेली. आता मराठी भाषेच्या अभिजातपणाचा सूर्य उगवलेला आहे, त्याचा प्रकाश सर्वत्र पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. मराठीचा वेलू गगनावरी नेण्यासाठी जे जे मराठी, ते ते जोपासण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी, असे आवाहन करून श्री. शिंदे म्हणाले, मराठी संस्कृती जपण्यासाठी आपण टोकाचे आग्रही असले पाहिजे. विविध घटकांच्या एकत्रिकरणातून मराठी संस्कृती आणि समाज तयार होतो. तो टिकविण्यासोबतच वाढविला पाहिजे. दोन वर्षांनी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. येत्या दोन वर्षात मराठी भाषेने गरुड झेप घ्यावी, मराठी ही आई, ज्ञानेश्र्वर माऊली, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, बहिणाबाई, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर अशी सर्वांचीच भाषा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत झालेले हे संमेलन दीर्घकाळ स्मरणात राहील, असे सांगून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

**नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू – उपमुख्यमंत्री पवार**

मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही देताना नवी दिल्लीत मराठीजनांसाठी स्वतंत्र भव्य वास्तू उभारण्यात येईल, अशी घोषणा करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या भव्य संस्कृतीला साजेशा अशा या वास्तूसाठी आगामी अर्थसंकल्पात शासन पुरेसा निधी उपलब्ध करून देईल. राज्य शासन अतिशय चांगल्या भावनेने सांस्कृतिक उपक्रमांसाठी मदत करत असते ही बाब लक्षात ठेऊन साहित्यिकांनी स्वाभिमानाने साहित्यनिर्मिती करावी. महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे सक्तीचे करण्यात आले आहे. याबाबत काही उणीवा असतील तर त्याचा पुन्हा आढावा घेतला जाईल. मराठी ज्ञानभाषा व्हावी, मराठीची उपयुक्तता वाढावी, ती बहुजात आणि बहुज्ञात व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही, तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरच्या मराठी भाषिकांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे राहील, असेही श्री पवार यांनी सांगितले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणाऱ्या पहिल्याच अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्धाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले हा ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे आभार मानले. विठ्ठल भक्तांचा मेळा दरवर्षी पंढरीत जमतो. त्याचप्रमाणे, संमेलनाच्या निमित्ताने दरवर्षी वेगळ्या वेगळ्या ठिकाणी साहित्यिकांचा मेळा साहित्य पंढरी निर्माण करतो. भक्तिभाव, समाधान आणि नवीन ऊर्जा या दोन्ही पंढरीचे विशेष गुणधर्म असून साहित्य संमेलनातून मिळणाऱ्या उर्जेतून नवे साहित्य निर्माण व्हावे. साहित्यिकांच्या लेखणीत समाजाला जागृत करण्याची, योग्य दिशा देण्याची क्षमता असते. तिचा वापर सकारात्मक बदलासाठी व्हावा. नवोदित लेखकांना गुणवत्तेनुसार संधी देण्याची भूमिका प्रथितयश साहित्यिकांनी घ्यावी. तसेच साहित्य संमेलनात विविध क्षेत्रातील मराठी भाषिक तरुणांचा सहभाग वाढायला हवा, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केली.

सध्या छावा चित्रपटाच्या निमित्ताने छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास युवा पिढी समोर आला आहे. छत्रपती संभाजी महाराज साहित्यिकही होते. तुळापूर, वढूला त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याचेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासन लवकरच सुरू होत असल्याची माहिती देऊन मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, साहित्याचा खरा संस्कार या संमेलनाच्या माध्यमातून होत आहे. या संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेले चाकावरचे साहित्य संमेलन हा अनोखा उपक्रम असून यापुढे होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त अशा यात्री संमेलनाचे नियमित आयोजन व्हावे. त्यास शासनाकडून मदत केली जाईल. मराठी भाषेचा मंत्री म्हणून या विभागाचा कार्यभार सांभाळताना आपण विविध उपक्रमांच्या माध्यमातून मराठीच्या विकासासाठी निष्ठेने प्रयत्न केल्याचे त्यांनी यावेळी आर्वजून सांगितले.

देशाच्या राजधानीत मराठीचा जल्लोष होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून श्री दर्डा म्हणाले, मराठी वाचन संस्कृती जगवण्यासाठी व्यापक प्रयत्न करावे. लोकांची वाचनाची आवड भागविण्यासाठी ग्रंथ विक्रीस प्रोत्साहन द्यावे. नव्या पिढीकडून मातृभाषेचा वापर वाढवण्यासाठी शिक्षणात मराठीचा आग्रहाने अंर्तभाव करणे आवश्यक आहे.

मराठी शाळांच्या सुधारणांसाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त करून संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, भाषा ही संस्कृतीची वाहक असते. तिची निगा राखणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. चांगले ठराव झाले. ते प्रत्यक्ष आले पाहिजेत. सीमा भागात त्या त्या भाषिकांची संख्या लक्षात घेऊन द्वैभाषिक शाळा सुरू झाल्या पाहिजेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दुय्यम स्तरावरची मराठी शिकवली जाते. त्यात सुधारणा व्हावी. परदेशी भाषांप्रमाणेच भारतातील इतर भाषा शिकण्याची सोय हवी. शासनाने त्यासाठी कृतिशील पावले उचलावीत. मराठी भाषा वाढण्यासाठी घराघरातील मुले मराठीत शिकली पाहिजेत याची सर्वांनी काळजी घ्यावी. ज्ञान क्षेत्र जर समृद्ध करायचे असेल तर ज्ञानाप्रती तळमळ, आस पाहिजे. तसा समाज ज्ञानसंपन्न होतो. सीमा प्रदेशात संस्कृतीचे अभिसरण घडत असते. 'भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे' ही संत ज्ञानेश्र्वरांची उक्ती आत्मसात करत आपण स्नेह, प्रेम वाढवूया, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावपूर्ण भाषणाचा समारोप केला.

रिद्धपूर येथे स्थापित मराठी विद्यापीठात नियमित कामकाज तातडीने सुरू व्हावे, त्यासाठी मनुष्यबळ व आर्थिक तरतूद व्हावी, बृहनमहाराष्ट्रातील संस्थांना आर्थिक पाठबळ द्यावे, बोलीभाषांच्या संवर्धनासाठी बोलीभाषा विकास अकादमी स्थापन करावी आदी बारा ठराव यावेळी करण्यात आले.

## मनोज जरांगेंच्या ताफ्यातील वाहनाचा महिलेच्या दुचाकीला धक्का, नंतर महिलेला घरात घूसून मारहाण, नेमके प्रकरण काय?



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यातील एका वाहनाचा दुचाकीला धक्का लागला मात्र काही वेळातच सदर महिलेच्या घरात जाऊन अज्ञात तिघांनी धुडगूस घातला. एवढेच नाही तर महिलेला मारहाण देखील करण्यात आल्याची घटना बीड जिल्ह्यात घडली. महिलेच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला. दरम्यान, ज्या वाहनाचा दुचाकीला धक्का लागला ते वाहन मराठा आंदोलक गंगाधर काळकुटे यांचे आहे. ओबीसी महिलेच्या घरात घुसून धुडगूस घालणाऱ्या अज्ञात व्यक्तींना तत्काळ अटक करा अशी मागणी मराठा आंदोलक गंगाधर कळाकुटे यांची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पोलिसांना निवेदन दिले आहे. सध्या बीड जिल्ह्यात सामाजिक स्थिती बिकट झालीय. या घटनेनंतर पुन्हा वाद पेटू नये यासाठी काळकुटे यांनी अज्ञात आरोपींना तत्काळ अटक करून घडलेली घटना स्पष्ट करावी अशी मागणी केली आहे.

नक्की प्रकरण काय ?

मस्साजोगला परवा जयंतीच्या कार्यक्रम ासाठी चौसाळ्याच्या दिशेने जात असताना कचारवाडीच्या जवळ मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यातील गाडीचा एका महिलेच्या दुचाकीला कट बसला . ही गाडी मराठा आंदोलन गंगाधर काळकुटे यांच्या नावावर आहे .संतापलेल्या महिलेच्या मुलाने ताफ्यातील गाड्या अडवल्या .दुचाकीला धक्का लागल्यावरून महिलेमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये वादावादी झाली .मात्र काही वेळातच सदर महिलेच्या घरात जाऊन अज्ञात तिघांनी धुडगूस घालत महिलेला म ारहाण केल्याची घटना घडली .याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .ज्या अज्ञातांनी महिलेला मारहाण केली त्या अज्ञातांना तात्काळ पकडून अटक करावी अशी मागणी गंगाधर काळकुटे यांनी केली आहे . या संदर्भातील निवेदनही त्यांनी पोलिसांना दिले आहे .या अज्ञातांना मराठा वंजारी वाद लावायचा होता का असा प्रश्न काळकुटे यांनी उपस्थित केला .मनोज जरांगेंच्या ताब्यात कोण्या अज्ञात आला गोंधळ करायचा होता का अशीही शंका काळकुटे यांनी उपस्थित केली .या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे .अज्ञातांना शिक्षा झाली पाहिजे असेही काळकुटे म्हणाले .महिलेच्या दुचाकीला ज्या वाहनाने कट बसला ते वाहन गंगाधर काळकुटे यांच्या नावावर आहे .

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### खामगाव रेल्वे मार्ग मंजुरीसाठी बैलगाडी यात्रा काढणार



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना -खामगाव रेल्वे मार्ग मंजुरीसाठी बैलगाडी यात्रा काढणार असल्याचा ईशारा रेल्वे कृती समितीने दिला आहे.केंद्रीय आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर हा ईशारा देण्यात आला.जालना ते खामगाव असा बैलगाडी मोर्चाचा रुट ठरवण्यात आला असून या रेल्वे मार्गाबाबत निर्णय घेतला गेला नाही तर जालना आणि बुलडाणा जिल्ह्यातील ठिकठिकाणचे रेल्वे कृती समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरीक आणि प्रतिष्ठित नागरीक देखील या मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. जालना - खामगाव रेल्वे मार्ग होण्यासाठी नागरीकांनी आम्हाला पाठिंबा द्यावा असंही रेल्वे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे याशिवाय जालना-बिड रेल्वे मार्गाबाबत देखील आम्ही आवाज उठवणार असल्याचे रेल्वे कृती समितीचे पदाधिकारी म्हणालेत.

### ठाकरेंच्या शिवसेनेत मर्सिडीजच्या बदल्यात पदं मिळायची; नीलम गोऱ्हेच्या वक्तव्यानंतर पुण्यात शिवसैनिक आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** दिल्लीत सध्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरु आहे. मराठी साहित्य संमेलनात 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरेंनावर मोठा आरोप केला. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचं, असा खळबळजनक विधान नीलम गोऱ्हे यांनी केलं. नीलम गोऱ्हे यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्राच्या वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडालीये. नीलम गोरे यांनी केलेल्या या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी आज पुण्यामध्ये महिला शिवसैनिक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. नीलम गोऱ्हे यांच्या पुण्यातील घराबाहेर महिला शिवसैनिकांनी आंदोलन करत निषेध व्यक्त केला. यावेळी कृत्रिम मर्सिडीज गाडी नीलम ताईंना भेट देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### आमच्या नजरेत नीलम गोऱ्हे चापलुस आणि गद्दार; नीलम गोऱ्हे यांच्या वक्तव्यावर सुषमा अंधारेंचं प्रत्युत्तर



**पुणे/प्रतिनिधी :** दिल्ली येथे सुरू असलेल्या मराठी साहित्य संमेलनामध्ये उद्धव ठाकरे यांना दोन मर्सिडीज दिल्यावर एक पद मिळत असं खळबळजनक वक्तव्य शिवसेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केल नीलम गोऱ्हे यांच्या या राजकीय वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलानमधील 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमातील मुलाखतीवेळी त्यांनी हे वक्तव्य केल त्यांच्या या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या

नीलम गोऱ्हे तीस वर्षे ज्या पक्षात राहिल्या तिथे असं काही होत असेल तर नीलम गोऱ्हे यांनी एवढा पैसा कुठे ठेवला. या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं पाहिजे. कारण मातोश्रीवर एवढा कोणताही माणूस वावरत नव्हता. त्या मातोश्रीवर पडीक असायच्या. कुठे-कुठे प्रॉपर्टी घेतली, परदेशात किती पैसे गुंतवले, याचा जाब द्यायच म्हणता पण जाब हा बरोबरीच्या माणसाला द्यायचा असतो. पण चापलुशा, बदमाशी करून आणि मर्जी मिळवून पद मिळवणारी लोकं असतील तर त्यांना जाब विचारून त्यांची उंची वाढवायची नसते. नीलम गोऱ्हे चार वेळा आमदार असली काय किंवा विधानसभेवर असली काय आमच्या नजरेत बदमाश आणि गद्दार असणार आहेत, असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे.

# संजय राऊतनी कुणाकुणाकडून पैसे घेतले ती यादी आमच्याकडे, गरज पडल्यास बाहेर काढू : संजय शिरसाट यांचा गौप्यस्फोट

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** निवडणुकीच्या वेळेस जे त्यांचे उमेदवार होते.त्यांनी आपण पैसे देऊन उमेदवारी घेतली असे जाहीर केले आहे. आणि म्हणून इतर पक्षातील अनेकांना त्यांनी पैसे घेऊन तिकीट दिले आहे. पहिले कार्यकर्त्यांना तिकीट दिल्या जात होते. मात्र, आता पैसे देईल त्याला तिकीट देऊ, अशी भूमिका आहे. म्हणून त्यांना जनतेने नाकारले आहे. म्हणून त्यांचा संख्याबळ वीस वर येऊन ठेपला आहे. आम्ही काहीच करत नाही असा आव आणून त्यांनी हुशारकी मारू नये, संजय राऊत यांनी कुणा कुणाकडून पैसे घेतले याची, यादी आमच्याकडे सुद्धा आहे. असा गोप्यस्पोट छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना केला.


यावेळी संजय शिरसाट म्हणाले की, सरकारने कुणाचे रक्षण देखील केले नाही आणि कुणाला पाठिंबा देखील दिला नाही. सरकारने या प्रकरणात कडक भूमिका घेतली असून आरोपींना अटक केली आहे. त्यांच्यावर मोका लावलेला आहे. त्यांना सजा देण्यापर्यंतची सर्व कारवाई केली आहे. कोकणच्या न्यायालयाच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर सरकार आपले काम करेल, आम्ही काहीच कारवाई करणार नाही, असे कुठलेही वक्तव्य सरकारने केले नाही.

पक्षचिन्ह वाटप ही न्यायालयाची प्रक्रिया आहे.त्यांनी न्यायालयाकडे पुन्हा रिव्ह्यू पिटेशन दाखल केले पाहिजे, त्यांनी न्यायालयाला सांगितले पाहिजे की, आम्हाला घाई आहे, लवकर निर्णय द्यावा, न्यायालय न्यायालयाच्या पद्धतीने निर्णय घेतो. त्यांच्यावर कुणाचाही दबाव चालत नाही. न्यायालयासमोर जाऊन आपली मागणी मांडणे हा त्यांच्या समोरचा पर्याय आहे. निलम गोऱ्हे काय बोलल्या हे मला माहित नाही. मात्र, मागच्या निवडणुकीच्या वेळेस जे त्यांचे उमेदवार होते.त्यांनी आपण पैसे देऊन उमेदवारी घेतली असे जाहीर केले आहे. आणि म्हणून इतर पक्षातील अनेकांना त्यांनी पैसे घेऊन तिकीट दिले आहे. आमच्या मतदार संघात कन्नड, पैठण, सिल्लोड, वैजापूर आणि पश्रि्चम मतदार संघात देखील पैसे देऊन तिकीट दिले आहे. पहिले कार्यकर्त्यांना तिकीट दिल्या जात होते. मात्र, आता पैसे देईल त्याला तिकीट देऊ अशी भूमिका आहे. म्हणून त्यांना जनतेने नाकारले आहे. म्हणून त्यांचा संख्याबळ वीस वर येऊन ठेपला आहे. आम्ही काहीच करत नाही असा आव आणून त्यांनी हुशारकी मारू नये. संजय राऊत यांनी कुणा कुणाकडून पैसे घेतले याची, यादी आमच्याकडे सुद्धा आहे. तिकीट जाहीर करताना जो गोंधळ संजय राऊत यांनी घातला आहे.गरज पडल्यास त्या लोकांना आम्ही उभे करू, एकनाथ शिंदे यांनी सभागृहात भुजबळांच्या समोर सांगितले होते की, आम्ही ४० दिवस जेलमध्ये होतो. तरीसुद्धा संजय राऊतला विश्वास नसेल तर त्यांनी ते रेकॉर्ड तपासावे आणि भुजबळ यांना विचारावे. तुम्ही कुठे सीमा भागात गेले तुम्ही काय केले ,तुम्ही कुठे दिवे लावले, लोकांची सहानुभूती कशी मिळेल, या दृष्टिकोनातून फक्त वक्तव्य करतात, जे काम करतात. त्यांना यांनी कधी संरक्षण दिले नाही आणि विचारपूस पण केली नाही. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तवर बोलताना म्हणाले की,शेतकऱ्यांनी अफूची शेती करावी असे त्यांचे मत आहे, का? गांजाची शेती करावी असा त्याचा अर्थ आहे का? शेतकऱ्यासाठी हे सरकार कटीबद्ध आहे. त्यांना सर्व सुविधा देण्याचे काम हे सरकार करत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार बांधील आहे. मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यावर असा आरोप करणे, आणि आपली शेती करायला लावणे असं त्यांचं मत असेल तर शेतकरी त्यांना धडा शिकवेल. छावा चांगला चित्रपट आहे. जगभरात त्याची प्रशंसा होत आहे. त्याचे अभिनंदन करणे सोडून दिले एखादा प्रसंग चुकीचा असेल तर, तुम्ही डायरेक्टरला बोलू शकता, पण काही लोकांनी चांगली निर्मिती झाली असून सुद्धा टीका करण्याचा विडा उचलला आहे. म्हणून लोक महापुरुषावर चित्रपट काढत नाही. बच्चू कडू यांच्याबाबत बोलताना शिरसाट म्हणाले की, लाचारी स्वीकारून आमदार होता येत नाही. लाचार लोक भरपूर आहे. परंतु स्वाभिमानाने जी निवडणूक लढवली, विजय पराजय होत असतो, प्रत्येक वेळेला मतदाराला गृहीत धरणे योग्य नाही. या निवडणुकीवरून त्यांना कळाले आहे. म्हणून आता ते मतदार संघाच्या बाहेर जात नाही. अशी त्यांच्याबद्दलची माहिती आहे. छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### ५५ वर्षांच्या व्यक्तीचा नववीच्या विद्यार्थिनीवर बलात्कार

**नागपूर/प्रतिनिधी :** ५५ वर्षीय व्यापाऱ्याने मित्राच्या १५ वर्षीय मुलीला महागडे कपडे, गिफ्ट, चॉकलेट देऊन प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला कारने सौंसरमध्ये नेऊन रात्रभर बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी मुलीचे आईवडिल पोलीस ठाण्यात पोहचले. त्यामुळे त्याने मुलीला घरी सोडून पळ काढला. या प्रकरणी कोंढाळी पोलिसांनी अपहरण आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केली. संजय ससाने (५५, सिंजर, ता. नरखेड) असे आरोपी व्यापाऱ्याचे नाव आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ वर्षीय मुलगी तनुजा (बदललेले नाव) ही कोंढाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आईवडिल व लहान भावासह राहते. आरोपी संजय ससाने कापूस खरेदी-विक्री करणारा व्यापारी आहे. तो तनुजाच्या वडिलाचा मित्र आहे. त्याला पत्नी व दोन मुले आहेत. त्यामुळे त्याचे नेहमी तनुजाच्या घरी येणे-जाणे होते.

## हरे कृष्ण हरे रामाच्या गजराने दुमदुमले शहर, इस्कॉन तर्फे रथयात्रेचे आयोजन





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय कृष्ण भवन अमृत संघ इस्कॉन यांच्यातर्फे आज सिडको परिसरामध्ये रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते ही रथयात्रा सिद्धार्थ चौक यांचा येथून बजरंग चौक, बळीराम पाटील स्कूल, शिव जागृत मंदिर पवन नगर, या मार्गे ही रस्त्याचा काढण्यात आली

आध्यात्मिक मार्गात सर्वांना प्रोत्साहन मिळावं आध्यात्मिकाची कशी सर्वांना गरज आहे हरिनाम घेण्याचं सर्वांना ओढ लागावी व हिंदू संस्कृती याची माहिती व्हावी या उद्देशाने या रथयात्रेचे आयोजन करण्यात आला आहे या वर्षातील ही चौथी रथयात्रा आहे असे प्रेमपद महाराजांनी सांगितले.

या रथयात्रेमध्ये हरे कृष्ण हरे रामाचा जयघोष करत मन प्रसन्न झाले रत ओढून आनंद वाटला मोबाईलच्या युगामध्ये लहान मुलांना धार्मिकतेकडे ओढ लावण्यासाठी हरे कृष्ण हरे रामाचा मंत्र्याचा जाप करून अध्यात्मिकाकडे ओढ लागावी या उद्देशाने सध्या रथयात्रा काढली जात आहे.



### भारत विरुद्ध पाकिस्तानचे क्रिकेट सामने झाले पाहिजे, खेळामध्ये राजकारण आणू नये - रामदास आठवले

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी:** भारत विरुद्ध पाकिस्तानचे क्रिकेट सामने झाले पाहिजे. दोन्ही देशांनी एकमेकांच्या देशात खेळले पाहिजे. खेळामध्ये राजकारण आणू नये पूर्वी विरोध होत होता मात्र तो आता बंद झाला पाहिजे अशी अपेक्षा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. तसेच आजची भारत विरुद्ध पाकिस्तानची मॅच आपणच जिंकणार असा दावा त्यांनी केलाय.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमध्ये धनंजय मुंडे यांचा कुठेही हात दिसत नाही. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष त्यांचा कुठेही संबंध दिसत नाही. विरुद्ध त्यांचा राजीनामा मागत आहेत. मात्र राजीनामा देणे किंवा न देणे याचा अधिकार धनंजय मुंडे यांनाच आहे.

पंढरपूरच्या दर्शन मंडप आणि स्काय वॉकची १३० कोटी रुपयांची निविदा रद्द करू नये. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे एकमेकांसोबत काम करीत आहेत. कुठलेही विकास काम किंवा विकासनिधी रोखला जाणार नाही. कर्नाटकामध्ये पुन्हा मराठीविरुद्ध कन्नड असा वाद पेटला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांमध्ये लक्ष घालावं. तात्काळ कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी आणि हे प्रकार थांबवावेत अशी मागणी मंत्री रामदास आठवले यांनी केली.

# राज्यात आता दरवर्षी महसूल क्रीडा स्पर्धा : चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ

- १ कोटी रुपयांची राज्य शासनाकडून तरतुदीची घोषणा
- राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धांमध्ये कोकण विभागाला सर्वसाधारण विजेतेपद
- यजमान छत्रपती संभाजी नगर द्वितीय तर पुणे विभागाचा तिसरा क्रमांक




**नांदेड/प्रतिनिधी :** येथे गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये कोकण विभागाने अव्वल राहत विजेतेपद पटकावले आहे. दुसरा क्रमांक यजमान छत्रपती संभाजीनगरला तर पुणे विभागाला तिसरा क्रमांक मिळाला. रविवारी सायंकाळी झालेल्या समारोप कार्यक्रमात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी महसूल मंत्र्यांनी दरवर्षी ही स्पर्धा घेण्याचे व त्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली.

दोन हजारावर अधिकारी -कर्मचारी क्रीडापटूंचा तीन दिवसांचा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा महोत्सव आज सायंकाळी थाटात संपन्न झाला. वैयक्तिक,सांघिक आणि मिश्र अशा विविध क्रीडा प्रकारामध्ये नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, कोकण तसेच नोंदणी मुद्रांक व भूमि अभिलेख विभाग अशा एकूण सात विभागांमध्ये ८३ क्रीडा प्रकारात लढती झाल्या.

२१ तारखेपासून दोन हजार खेळाडू विविध मैदानावर लढत देत होते. तर २१ व २२ तारखेला यशवंत कॉलेज मैदानावर सायंकाळी या सर्व खेळाडूंनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. डोळ्याचे पारणे फेडणारे रंगमंच आणि अतिशय व्यावसायिकतेने सादर केलेली प्रत्येक कलाकृती यामुळे सांस्कृतिक कार्यक्रम लक्षवेधी ठरला.सांस्कृतिक स्पर्धेमध्ये नाशिक विभागाने प्रथम, कोकण विभागाने द्वितीय व नागपूर विभागाने तृतीय पुरस्कार मिळवला.

या स्पर्धेमध्ये कर्मचाऱ्यांनी केलेले संचलन हे देखील एक उपलब्धी ठरली आहे. यजमान छत्रपती संभाजी नगरने यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला तर द्वितीय क्रमांक नाशिक तर तृतीय क्रमांक कोकण विभागाने पटकावला.

क्रिकेट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, धावणे, चालणे, जलतरण, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बॅडमिंटन,गोळा फेक, थ्रो बॉल, थाळीफेक, भालाफेक, रिंग टेनिस, जलतरण, संचलन अशा १५ क्रीडा प्रकारामध्ये पुरुष, महिला व मिश्र संघ, ४५ वर्षावरील संघ,असे एकूण ८२ क्रीडाप्रकार होते. तसेच सांस्कृतिक आयोजन अशा एकूण ८३ घटकातून गुणानुक्रमांक देण्यात आले.यामध्ये कोकण विभागाने सर्वाधिक ३४१ गुण मिळवले. तर त्या पाठोपाठ यजमान छत्रपती संभाजी नगरने २२७ गुण मिळवले तर तिसऱ्या क्रमांकावर २१७ गुणांसह पुणे विभाग राहिला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी संबोधित करताना बारा वर्षानंतर नांदेडमध्ये या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्याचा आनंद व्यक्त केला. मात्र यापुढेही क्रीडा स्पर्धा दरवर्षी घेतली जाईल. यासाठी राज्य शासन एक कोटीची तरतूद करेल अशी घोषणा केली. तसेच नियुक्ती आणि पदोन्नती देताना क्रीडापटूंना अग्रस्थान दिले जाईल अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नागरिकांना तक्रारी करता येईल अशा पद्धतीचे व्हाट्सअप ग्रिवियन्स प आज महसूल मंत्र्यांच्या हस्ते नांदेडच्या नागरिकांना लोकार्पित करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कल्पकतेतून ही सुविधा नागरिकांना बहाल करण्यात येत आहे. ९२७०१०१९४७ व्हाट्सअप क्रमांकावर आपली तक्रार, मागणी, म्हणणे पाठवता येणार आहे. याला प्रतिसाद येणारी यंत्रणा उद्यापासून कार्यान्वित होणार आहे.

यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांनी महसूल मंत्र्यांनी १२ वर्षानंतर या स्पर्धा पुन्हा सुरू केल्याबद्दल आभार व्यक्त केले. पालकमंत्री म्हणून इतक्या मोठ्या आयोजनात माझं दायित्व असल्याचे समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

बक्षीस वितरणाच्या या कार्यक्रमाला खासदार डॉ.अजित गोपछडे,आमदार बाबुराव कदम कोहळीकर, आ. तुषार राठोड,आ. राजेश पवार, विभागीय आयुक्त दिलिप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक शाहाजी उमाप, छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलिप स्वामी, धाराशिव जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव, जालनाचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, सहाय्यक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा,अपर आयुक्त महसूल श्रीमती नयना बोंदार्डे, अपर आयुक्त प्रदीप कुळकर्णी, अपर आयुक्त कोकण नितीन महाजन, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## विविध वृत्त...

# बेवारस वाहने घेऊन जाण्याचे शिरपूर पोलिसांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** शिरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक वर्षे बेवारस पडलेल्या वाहनांना घेऊन जाण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. ७ दिवसांत ही कार्यवाही करण्यात येणार असून, नागरिकांनी आपली वाहने घेऊन जावे, असे आवाहन शिरपूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक रामेश्र्वर चव्हाण यांच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले. शिरपूर पोलीस ठाण्याच्या आवारात गेल्या अनेक वर्षां पासून ते आजपर्यंत विविध गुन्ह्यांतील बेवारस दुचाकी व चारचाकी वाहने वर्षानुवर्षे पडून आहेत. या वाहनांचे चेसीस क्रंमाक व इंजीन क्रमांक याची तपासणी करून वाहन मूळ मालकाला परत देण्यात येणार आहे. वाहनाच्या मालकांनी स्वतः वाहनाचे कागदपत्रासह शिरपूर पोलिस ठाणे येथे उपस्थित राहायचे आहे.७ दिवसांच्या आत योग्य ती कायदेशीर बाबींची पूर्तता करून वाहन घेऊन जावे, असे आवाहन शिरपूर पोलिस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे. त्यांनतर लिलाव प्रकिया झाल्यास पोलिस प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे पोलिस प्रशासनाने सांगितले आहे.

# पुण्यात वाहनांच्या तोडफोडीचे सत्र सुरूच

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे शहरात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले आहे. वडगाव शेरी भागात शनिवारी मध्यरात्री एका टोळक्याने वाहनांची तोडफोड करत दहशत माजवली. या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही संशयितांना ताब्यात घेतले आहे.

टोळक्याकडे लाकडी दांडके होते. त्यांनी परिसरात उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड केली. दोन रिक्षा आणि १० ते १२ दुचाकींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करण्यात आले. यावेळी स्थानिक नागरिकांनी गोंधळ पाहून घराबाहेर येण्यासही घाबराट दर्शवली. टोळक्याने वाहनांच्या काचा फोडल्या, काही गाड्यांना पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केला, तसेच लोकांना शिवीगाळही केली.

# दुचाकी बैलगाडीला धडकली; एका बैलासह दोघांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापुरात दुचाकी आणि बैलगाडी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एका बैलासह दुचाकीवरील दोघेजण ठार झाले आहे. ही घटना सांगोला येथील हॉटेल श्रीराम हॉटेलजवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली आहे. अभिजित दादा भोसले व नंदकुमार चंद्रकांत चौधरी (दोघेही रा. पापरी, ता. मोहोळ) हे जागीच ठार झाले आहेत. बैलगाडी चालक जखमी झाला आहे.

धायटी (ता. सांगोला) येथील शेतकरी बैलगाडी घेऊन रविवारी असणाऱ्या सांगोला येथील आठवडा बाजारात बैल विक्री करण्यासाठी निघाले होते. दरम्यान, त्यांची बैलगाडी रत्नागिरी- सोलापूर हा महामार्ग ओलांडून सांगोल्याच्या दिशेने जात असताना सोलापूरच्या दिशेने चाललेली एमएच १३ – ईजी ५३६५ या क्रमांकाची दुचाकी बैलगाडीवर आदळली.

हा अपघात इतका भीषण होता, की यामध्ये गाडीचा एक बैल आणि दुचाकीवर असणारे अभिजित दादा भोसले (वय २८) व नंदकुमार चंद्रकांत चौधरी (वय २७, दोघेही रा. पापरी, ता. मोहोळ) हे दोघे जागीच ठार झाले. तर बैलगाडी चालक जखमी झाला आहे. अपघाताची माहिती समजताच सांगोला पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि अपघातातील जखमी आणि मृतांना सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तत्पूर्वीच दोन्ही दुचाकीस्वारांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले.




# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४१ वा दीक्षांत समारंभ

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी:** विद्यापीठाने पारंपरिक अभ्यासक्रमासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि रोबोटिक्स या सारख्या प्रगत क्षेत्रात शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केले. आज संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

यावेळी दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई हे उपस्थित होते. उद्योगांच्या गरजा पूर्ण करतील असे अभ्यासक्रम तयार केले पाहिजे असे सांगून राज्यपाल यांनी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ रोजगारक्षम बनवता कामा नये, तर त्यांच्यात कामाप्रति आणि जीवनाप्रति योग्य दृष्टिकोनही साधता आला पाहिजे तरच वाढलेल्या सामाजिक आनंदाने राष्ट्राचा विकास साधता येईल असे सांगितले. माझ्या राज्यपाल पदाच्या कार्यकाळात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हे माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. त्यासाठी राज्यपाल यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. पदवीदान समारंभ हा केवळ शैक्षणिक प्रवासाच्या समाप्तीचे प्रतीक नाही,तर नव्या जबाबदार्या, संधी, आणि आव्हानांचे दार उघडतो असे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना आपल्या दीक्षांत भाषणातून सांगितले. मुल्य शिक्षण हे केवळ शैक्षणिक प्रगतीसाठी नाही तर तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या समृद्धीसाठी



महत्त्वाचे असून मुल्य शिक्षणाने नैतिकता निर्माण होते असे मतही न्यायमूर्ती भूषण गवई यांनी व्यक्त केले. आजच्या विद्यार्थ्यांवर नवा भारत घडवण्याची जबाबदारी असून संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या शिकवणीना पुढे नेऊन आपला देश स्वच्छ आणि सुसंस्कृत बनवावा असे आवाहन न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्यांचे हस्ते विविध परीक्षांमध्ये स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना १२२ सुवर्णपदक, २२ रौप्यपदक व २४ रोख पारितोषिके असे एकूण १६८ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. मुलींमध्ये सर्वाधिक पारितोषिक जी एस टोपे कला व वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी हर्षली हटवार हिने ६ सुवर्ण व एक रोख पटकावले. तर प्रो राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च महाविद्यालयाची विद्यार्थिनी निकिता देवचे हिने ६ सुवर्ण तर लोकनायक बापूजी अने महाविद्यालयातील विद्यार्थिनी उत्कर्षा वानरे हिने ४ सुवर्ण १ रौप्यपदक आणि एक रोख पारितोषिक प्राप्त केले. या दीक्षांत समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य तसेच सर्व विद्याशाखेचे अधिष्ठाता आदी मान्यवर उपस्थित होते.

# १००० दिवस थिएटरमध्ये हाऊसफुल्ल! या अभिनेत्रीच्या सिनेमाने गाजवलं बॉक्स ऑफिस

**मुंबई/प्रतिनिधी :** आजकाल सिनेमे थिएटरमध्ये रिलीज होतात, काही काळ चालतात, मग लगेच ते ओटीटीवर धडकतात. मात्र, असे काही सिनेमे आहेत जे अनेक काळ थिएटरमध्ये तग धरून होते. ज्यांनी कमाईतही रेकॉर्ड मोडले आणि अनेक दिवस प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. बॉलिवूडमध्ये असे अनेक चित्रपट आहेत, ज्यात 'शोले', 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' यांचा समावेश आहे, जे अनेक महिने आणि वर्षे थिएटरमध्ये राहिले. या चित्रपटांनी विक्रमी कमाईही केली. पण तुम्हाला असा कोणताही साऊथ सिनेमा माहित आहे का जो महिने किंवा वर्षे थिएटरमध्ये प्रदर्शित झाला?

एका साऊथ सिनेमाने तब्बल १००० दिवसांहून अधिक काळ थिएटरमध्ये घर केलं होतं. या चित्रपटाची मुख्य अभिनेत्री त्रिशा कृष्णन आहे. त्याच्या विरुद्ध मुख्य भूमिकेत रजनीकांत किंवा थलापती नाही. या सिनेमाने कमाईचे रेकॉर्ड मोडले होते.

२०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचं नाव आहे 'विनैथांडी वारुवाया'. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला. ही आंतरधर्मीय प्रेमाची आणि त्यामुळे प्रभावित झालेल्या दोन कुटुंबांची-समाजांची कहाणी आहे. या चित्रपटात त्रिशाने जेसी थेक्केकुटू नावाच्या सीरियन कॅथोलिक मल्याळी मुलीची भूमिका साकारली होती. त्याच्या विरुद्ध मुख्य भूमिकेत होता सिलंबरसन, ज्याला प्रेमाने सिंबू म्हणतात. सिंबूच्या चित्रपट कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय चित्रपटांपैकी एक म्हणजे 'विनैथांडी वारुवाया'. या चित्रपटाला अनेक कामगिरी आणि पुरस्कार मिळाले आहेत. हा चित्रपट २०१० पासून दरवर्षी व्हॅलेंटाईन वीक दरम्यान चेन्नईतील पीव्हीआर सिनेमा हॉलमध्ये प्रदर्शित केला जात आहे. तो १ हजार दिवसांहून अधिक काळ थिएटरमध्ये टिकला आहे. हा तमिळ चित्रपटसृष्टीतील सर्वात रोमँटिक चित्रपटांपैकी एक आहे.

# युवकांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावे: शिवव्याख्याते पांडुरंग पाटील यांचे आवाहन

## व्याख्यानातून वैचारिक शिवजन्मोत्सव साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर :** शिवजयंती हा उत्सव हा गावोगावी साजरा केला जात आहे. ठिकठिकाणी कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे.आदी कार्यक्रम करताना आजच्या युवकांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावे, असे आवाहन शिवव्याख्याते पांडूरंग पाटील यांनी केले. ते शंभुराजे मित्र मंडळ, संताजी नगर मेहकर येथे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी प्रबोधन करताना पांडुरंग पाटील म्हणाले की, विचारांचे जागर होणारे महापुरुषांचे जन्मोत्सव प्रत्येक ठिकाणी साजरे व्हावेत,आज मात्र



केवळ नाचगाणे करुन जयंती उत्सव साजरे होत आहेत. ती समाजासाठी विचार करायला लावणारी बाब आहे.जयंती ही उत्सव म्हणून नक्की साजरी करावी, त्याबद्दल आक्षेप नाही. परंतु, केवळ नाचगान्यांतुन महापुरुषांचे कुठले जिवनचरित्र आपण येणाऱ्या पिढ्यांच्या समोर मांडत आहोत,याची विचार व्हावा असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच नायगांव दत्तापुर येथेही व्याख्यानाच्या माध्यमातुन त्यांनी विचारांचा जागर करत शिवजन्मोत्सव साजरा करावा, असे आवाहन केले. तसेच नायगांव गावकऱ्यांच्या तसेच शंभुराजे मित्र मंडळ संताजी नगर मेहकर यांनी विचारांचा जागर असणारा जन्मोत्सव आयोजित केला.या उत्कृष्ट आयोजनाबद्दल दोनही ठिकानावरील आयोजकांचे त्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक दिपक पाचरणे, व तालुकाध्यक्ष बाहेकर यांनीही विचार व्यक्त केले.यावेळी शिवभक्तांची प्रचंड संख्येने उपस्थिती होती.

# शिरपूर येथे हेलिपॅडसाठी जागेची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

शिरपूर जैन/प्रतिनिधी : जैनाची काशी म्हणून ओळख असलेल्या शिरपूर जैनची तालुक्यातून हेलिपॅडसाठी निवड करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार दीपक पुंडे यांनी दिली आहे. त्यासाठी शिरपूर ते वाघी आसेगाव रोडवर जागेची पाहणी करण्यात आली आहे. शिरपूर हे जैनाची काशी म्हणून शिरपूरची जगप्रसिद्ध ओळख आहे. शिरपूरला तीर्थक्षेत्राचा दर्जा सुद्धा प्राप्त आहे.

देश व देशातून भाविक तसेच मंत्री शिरपूर येथे दर्शनासाठी येतात. सर्वधर्मियांचे जानगीर महाराज संस्थान येथे सुद्धा महाशिवरात्रीनिमित्त मोठी यात्रा भरते, यावेळेस सुद्धा लाखो भाविक या ठिकाणी येत असतात. मुस्लिम धर्मियांचे संत मिर्झा मिया बाबा यांचा सुद्धा दर्गा प्रसिद्ध आहे. इथे



सुद्धा नोव्हेंबर महिन्यामध्ये दरवर्षी मोठी यात्रा भरते. या ठिकाणी सुद्धा मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात या ठिकाणी येतात. येथील सोनार समाजाचे महाराष्ट्रातील फक्त शिरपूर येथे पंचमुखी विश्वकर्मा मूळ देवस्थान आहे. या ठिकाणी सुद्धा विश्वकर्मा जयंती निमित्त दूरवरून भाविकभक्त कार्यक्रमानिमित्त येतात. या ठिकाणी येणाऱ्या हेलिकॉप्टर येणाऱ्या भाविकांना उतरवण्यासाठी हेलिपॅडची सुवधिा व्हावी, यासाठी शासनाने शिरपूरची निवड केली असल्याची माहिती तहसीलदार दीपक पुंडे यांनी दिली आहे.

२०२२ मध्ये आचार्य श्री विद्यासागर महाराज हे शिरपूर येथे आले होते. तेव्हा त्यांचा इथे चार महिने चातुर्मास होता. तेव्हा देश-विदेशातून भाविक या ठिकाणी श्रींच्या दर्शनासाठी येत होते. तेव्हा शिरपूर ते वाघी रोडवर तात्पुरते हेलिपॅड तयार करण्यात आले होते. त्यानुसार शासनाने एक प्लॅन तयार केला असून तालुक्यातून एक हेलिपॅड तयार करण्यात येणार आहे. यासाठी तालुक्यातून शिरपूरची करण्यात आली आहे. त्या जागेची मालेगावचे तहसीलदार दीपक पुंडे, शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्र्वर चव्हाण, महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी पाहणी केली आहे. याआधी सुद्धा बांधकाम विभागाने या जागेची पाहणी केली होती.

# शिवजंयती निमित्त विविध मान्यवरांचा मादणी येथे सत्कार

## शिवजयंती उत्सव समितीचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथून जवळच असलेल्या मादणी येथे शिवजंयती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच यावेळी अनेक उपक्रम सुद्धा राबवून सांयकाळी ७ वाजता शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात असलम खान यांचा शिवजयंतीनिमित्त शिवभक्तांच्या वतीने व युवा नेते ऋषी जाधव यांच्याहस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचे चिरंजीव ऋषी जाधव हे होते. कार्यक्रमची सुरवात महाआरती व शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पुजनाने करण्यात आली. या नंतर गावातील सर्व मंडळीसाठी गरजू





विद्यार्थिसाठी अभ्यासिकेचे व तसेच शिवाजी महाराजांच्या पुतळा सुशोभीकरण कार्यक्रमाचे ऋषी जाधव यांच्याहस्ते उद्धाटन करण्यात आले.

तसेच यावेळी असलम खान यांच्यासह इतर मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ऋषी जाधव यांनी गावात अनेक उपक्रम राबवून गावाचा विकास करणे, गरजेचे असून ज्यांनी आपल्या मूळ गावाचा वसा घेऊन जेथे आहे. त्या ठिकाणी आपल्या कार्यामध्ये उल्लेखनीय नाव अवलौकीक कामगिरी करून आपल्या गावाच नाव मोठ केले.

इतकेच नव्हे तर, राज्यस्तरावर नाव केले. ही बाब गावासाठी उलेखनीय गौरवाची आहे. अशा व्यक्तीचा गावकरी मंडळीकडून सत्कार होतो हे गावासाठी अभिनंदनीय बाब आहे. असलम खान यांनी आपल्या शाळेमध्ये उल्लेखनीय कामगीरी करून त्यानी शाळेसाठी दहा वेळा विज्ञान प्रदर्शनीमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, जिल्हास्तरवर सहा वेळा प्रथम क्रमांक पटकविला आहे.

राज्यस्तरावर पाच वेळा पात्र झाले होते. या व्यतिरिक्त त्यांच्याकडे वेगवेगळे ४० सर्टिफिकेट आहेत. त्यांना औरंगाबाद येथे एका शानदार सोहळ्यामध्ये भारतीय समाज विकास अकादमी तर्फे समाज श्री पुरस्कार मिळाला आहे.मुंबई येथे अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्र लेखक संघ मुंबई यांच्यातर्फे सुद्धा राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप मानपत्र हा पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. याच कार्याची दखल घेत त्यांना विजू जाधव व प्रताप बाजड यांच्याहस्ते पुरस्कार देण्यात आला.

तसेच यावेळी ऋषी जाधव,धीरज रायमुलकर, वसंतराव मेटांगळे (माजी सैनिक), भगवानराव तायडे, डॉ. प्रशांत दिवठाने (नेत्ररोग तज्ञ), डॉ. रूपम दिवठाने,डॉ. विजय मेटांगळे, डॉ. स्वप्नील चव्हाण,डॉ. भगवान मेटांगळे, प्राचार्य संजय बाजड,असलम खान,संदीप मेटांगळे (गटविकास अधिकारी),पंजाबराव मेटांगळे (मंडळ अधिकारी मेहकर),माधव मेटांगळे (कोल्हापूर),वैभव चव्हाण (निर्धारण अधिकारी बुलढाणा), ऋषिकेश शरद मेटांगळे, विठ्ठल भांदुर्गे आदी मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिवभक्तांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना बाजड यांनी केले. तर,तेजराव जाधव यांनी आभार मानले.